**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वनविभाग**

**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग**

**हिराकोट तलावाजवळ, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१**

दुरध्वनी क्र. ०२१४१/२२२११८ फॅक्स क्र. ०२१४१/२२७४५१, Email: tahasildargadraigad@gmail.com


**(गृह शाखा) क्र.गृह/एमएजी-१/करोना प्रति.उपा./सीआरपीसी कलम १४४/२०२० दि.31/०३/२०२०**

**वाचले:-** १) साथरोग अधिनियम १८९७

२) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४

३) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम २५, ३०, ३३, ३४, ४१ व कलम ५१

४) शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०

५) शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०

६) या कार्यालयाकडील आदेश क्र.गृह/एमएजी-१/करोना प्रति.उपा./सीआरपीसी कलम १४४/२०२० दि.२२/०३/२०२०

७) शासन, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील अधिसूचना क्र. डीएमयु/२०२०/सीआर-९२/डीएम-१ दि.२३/०३/२०२०

८) गृह मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील आदेश क्र.१०-३/२०२०-डीएम-आय(ए) दि.२४/०३/२०२०

९) या कार्यालयाची मंजूर टिपणी दि.३१/०३/२०२०

---

## - अधिसूचना -

ज्याअर्थी,शासन,सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उपोद्घातातील अ.क्र.४ कडील अधिसूचने द्वारे साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २, ३ व ४ ची अंमलबजावणी राज्यात सदर अधिसूचनेच्या प्रसिध्दी दिनांकापासून सुरु करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने करोना विषाणू संक्रमण हा जागतिक साथीचा रोग (World Pandemic) घोषित केला असून, शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उपोद्घातातील अ.क्र. ५ कडील अधिसूचनेद्वारे करोना विषाणूचा प्रसार रोखण्याकामी **"महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम २०२०"** प्रसिध्द केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांना उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष घोषीत करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना या विषाणूचे संसर्ग बाधीत रुग्ण आढळत आहेत. तसेच आंतराराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाद्वारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहेत, असे प्रवासी पुणे जिल्ह्यामध्येही परदेशी प्रवास करुन आलेले आहेत व बरेच प्रवासी परतण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव परसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होवू न देता त्यावर प्रतिबंधात्मक

उपाय योजना आखणे आवश्यक आहे. अशा प्रवाशांमुळे कोरोना विषणूचा संसर्ग जिल्ह्यात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे इ. बाबी टाळणे अत्यावश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून या कार्यालयाकडील उपोद्घातातील अ.क्र.६ कडील आदेशानुसार फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार सदर आदेशात नमूद सूचनांच्या अधिन राहून रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे कार्यक्षेत्रात दि. २२/०३/२०२० रोजी रात्री ९.०० वा. पासून ते दि.३१/०३/२०२० रोजी रात्री १२.०० वा. पर्यंत मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, मा.पंतप्रधान मोहोदयांनी दि.१४/०४/२०२० रोजी पर्यंत देशात लॉकडाऊन घोषीत केलेला आहे व त्याबाबत गृह मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून उपोद्घातातील अ.क्र.८ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे करोना विषाणूचा प्रसार, संसर्ग व प्रादुर्भाव रोखण्यासाठी व त्यामुळे सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास असलेला धोका विचारात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून यापुर्वी लागू केलेल्या फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ च्या तरतुदीनुसार पारीत आदेशामध्ये दि.१४/०४/२०२० पर्यंत वाढ करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी, निधी चौधरी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी रायगड मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) नुसार प्राप्त अधिकारातून उक्त संहितेतील कलम १४४ (१) (३) नुसार खालील सूचनांच्या अधिन राहून **रायगड पोलीस अधीक्षक यांचे कार्यक्षेत्रात दि.३१/०३/२०२० रोजीचे रात्री १२.०० वा. पासून ते दि.१४/०४/२०२० रोजीचे रात्री १२.०० वा. पर्यंत** मनाई आदेश लागू करीत आहे.

१) रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे कार्यक्षेत्रात खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील असे सर्व प्रकारचे कार्यक्रम, समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, सण, उत्सव, ऊरुस, जत्रा, मनोरंजनाचे कार्यक्रम, क्रिडा व इतर सर्व स्पर्धा इ. यांना मनाई राहील.

२) रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे कार्यक्षेत्रात खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील अशा सर्व प्रकारची कृत्ये जसे कार्यशाळा, कॅम्प, प्रशिक्षण वर्ग, बैठक, मिरवणूक, मेळावे, सभा, आंदोलने, देशांतर्गत व परदेशी सहली इ. यांचे आयोजन करण्यास मनाई राहील.

३) रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे कार्यक्षेत्रात असणारी दुकाने / सेवा आस्थापना, शॉपींग कॉम्प्लेक्स, मॉल्स्, सुपर मार्कट, मनोरंजनाची ठिकाणे, क्लब / पब, क्रीडांगणे, मैदाने, जलतरण तलाव, उद्याने, सिनेमागृह, नाट्यगृहे, शाळा, महाविद्यालये,खाजगी शिकवणी वर्ग, व्यायामशाळा, संग्रालये, व्हिडीओ पार्लर, ऑनलाईन लॉटरी सेंटर, ब्यूटी पार्लर, सलून इ. बंद राहतील.

४) रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे कार्यक्षेत्रात असणारी सर्व परमिट रुम, बिअर बार, वाईन शॉप, देशी दारुचे दुकाने, लाईव्ह ऑर्केस्ट्रा, सोशल क्लब, सेतू केंद्रे, आधार केंद्रे, सीएससी केंद्रे, नोंदणी विभाग तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत घेतली जाणारी ड्रायव्हिंग टेस्ट, वाहन नोंदणी दि.१४/०४/२०२० रोजीपर्यंत बंद राहतील.

५) जिल्ह्यातील सर्व धर्मियांची प्रार्थना स्थळे नागरिकांसाठी बंद राहतील. सदर प्रार्थना स्थळामध्ये परंपरे नुसार केली जाणारी नियमित पुजा अर्चा, धार्मिक विधी तीन किंवा त्यापेक्षा कमी व्यक्तींच्या उपस्थितीत करण्यास मान्यता राहील.

६) रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे कार्यक्षेत्रात कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतुकीच्या रस्त्यावर, गल्लोगल्ली सर्व प्रकारची तीन चाकी वाहन, हलकी वाहने, मध्यम वजनाची वाहने, रिक्षा, टॅक्सी (ॲप आधारित ओला, उबेर व तत्सम वाहनांसह), दुचाकी वाहने यांच्या वापरावर नागरी क्षेत्रात निर्बंध लागू करण्यात येत आहेत.

७) सर्व नागरीकांना अनावश्यक रित्या सार्वजनिक ठिकाणी विहीत कारणाशिवाय येण्यास मनाई राहील.

## सदरचे आदेश खालील बाबींकरीता लागू होणार नाहीत.

१) शासकीय/निमशासकीय कार्यालये, सरकारी महामंडळाचे उपक्रम/आस्थापना, बँका

२) अत्यावश्यक सेवेतील व्यक्ती, रुग्णालये, पॅथोलॉजी लॅबोरेटरी, दवाखाना, सर्व प्रकारचे वैद्यकीय महाविद्यालय (अॅलोपथी, आयुर्वेदिक, होमिओपथी), नर्सिंग कॉलेज, नर्सेस, वार्ड बॉय, सफाई कर्मचारी, खाजगी व शासकीय सुरक्षा रक्षक इ.

३) अंत्यविधी (या ठिकाणी गर्दी होऊ नये याची दक्षता घ्यावी)

४) अत्यावश्यक किराणा सामान, दुध/दुग्धोत्पादने, फळे व भाजीपाला, मटन/चिकन/मासे विक्री दुकाने, मत्स्य व मत्स्य खाद्य, कृषी पुरक उत्पादने इ. वाहतूक, औषधालय (Chemist) व त्यांचे घाऊक विक्रते (Holeseller), वितरक (Distributer), जिवनावश्यक वस्तु विक्री / वितरीत करण्यास, घरपोच सेवा पुरविण्यास परवानगी राहील.

५) सर्व हॉटेल/लॉज यांना तेथे वास्तव्यास असणाऱ्या ग्राहकांना आरोग्यविषयक आवश्यक ती खबरदारी घेऊन रेस्टॉरंट मध्ये खाद्यपदार्थ बनवून देण्यास परवानगी राहील

६) इ.१० वी व इ.१२ वी तसेच राज्य शासन व केंद्र शासनाकडून घेण्यात येणाऱ्या सर्व स्पर्धा परिक्षा, विद्यापीठ / विश्व विद्यालयाच्या परीक्षा देणारे विद्यार्थी व संबंधित शैक्षणिक व्यक्ती.

७) ज्या आस्थापना (उदा. माहिती व तंत्रज्ञान उद्योग, Major Port, Import-Export करणारे उद्योग, Petrochemical, Fertilizers उद्योग इ.) ज्यांच्याकडे देश व परदेशातील अतिमहत्वाच्या (Critical-National & International Infrastructure) उपक्रमांची जबाबदारी आहे व सदर आस्थापना बंद राहिल्याने अशा उप क्रमांच्या प्रक्रियेला बाधा येऊ शकते, ज्या कंपन्यांची उत्पादन प्रक्रिया अखंडीत चालू राहणे (Continuous Processing Industry) अनिवार्य आहे अशा सर्व कंपन्या, मॅन्युफॅक्चरींग अँण्ड प्रॉडक्शन कंपनी, खाद्य, मेडिकल उपकरण, औषधे इ. चे उद्योग तसेच त्यांना कच्चा मालाचा (Raw Material) पुरवठा करणाऱ्या, त्यांची उपउत्पादने करणाऱ्या कंपन्या व त्यांच्या Pakaging करणाऱ्या सर्व कंपन्या कार्यान्वित राहू शकतील.

९) उपरोक्त आस्थापनेमधील व पेट्रोलियम पदार्थ, कच्चे खनिज तेल (Crud Oil) साठवणूक करणाऱ्या गोदामांमधील यंत्रसामुग्री दुरुस्ती व देखभाल, कंपनी परिसरात रखवाली व साफसफाई करणेकामी कमाल ०२ वाहने व जास्तीत जास्त २० इतके कर्मचारी (वाहनचालकांसहीत) यांना कंपनीमध्ये प्रवेश देण्यास या आदेशान्वये मुभा देण्यात येत आहे. बंद औद्योगिक कंपन्यामध्ये आवश्यकतेनुसार कर्मचारी यांना (कमाल २०) प्रवेश करण्यास मुभा राहील.

१०) प्रसारमाध्यमांचे (सर्व प्रकारचे दैनिक, नियतकालिके, टिव्ही न्युज चॅनल इ.) कार्यालये व त्यांची वाहने चालू राहतील.

११) पूर्व नियोजित विवाह समारंभ (२५ पेक्षा जास्त उपस्थिती असू नयेत)

१२) घरपोच दिल्या जाणाऱ्या सेवा उदा.अॅमेझॉन, फ्लिप कार्ट, बिग बास्केट,किराणा सामान, LPG गॅस सिलेंडर इ.

१३) मोबाईल कंपनी टॉवर, मोबाईल दुकाने संबधित काम सुरु राहील.

१४) पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी व सरकारी संस्था, साफ सफाई करणाऱ्या संस्था, त्यांच्या गाड्या व जन जागृती करणाऱ्या गाड्या दुरध्वनी व इंटरनेट सेवा पुरविणाऱ्या संस्था, विद्युत पुरवठा करणाऱ्या संस्था व ऊर्जा विभाग, बँकीग सेवा, आयटी सेवा, व जिवनावश्यक पुरवठ्याशी निगडीत आहेत अशा सेवा वगळण्यात येत आहे.

१५) अँम्ब्यूलन्स, वस्तुंची वाहतूक करणारी वाहने, सर्व प्रकारची अवजड वहाने, शेती पुरक मालीची वाहतूक करणारे वाहने, टॅक्ट्रर्स, आग्निशामक दलाची वाहने इ. यांची वाहतूक सुरु राहील.

१६) वरील बाबीकरीता वापरली जाणारी सर्व प्रकारची वाहने तसेच सवलत दिलेले अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्यावर असताना वापरात येणारी वाहने यांच्या वापरास परवानगी राहील. तथापि सदर सवलत दिलेल्या अधिकारी व कर्मचारी तसेच खाजगी व्यक्ती यांनी त्यासाठी ओळखपत्र व सदर विशेष कार्यासाठी नेमणूकीबाबतचे आदेश तसेच रुग्णांनी आवश्यक कागदपत्रे सोबत बाळगणे बंधनकारक असेल.

१७) जिल्ह्यातील सर्व पेट्रोलपंप सुरु राहतील. तथापि, नागरी क्षेत्रातील पेट्रोलपंपावर केवळ या कार्यालयाच्या आदेशाप्रमाणे सूट दिलेल्या वाहनांना इंधन उपलब्ध करुन देता येईल. सदर इंधन देताना संबधित वाहन चालकाकडून उपरोक्त बाब क्र.१६ मध्ये नमूद केलेनुसार आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे बंधनकारक राहील.

तसेच सर्व सबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

सदरचा आदेश पोलीस, आरोग्य सेवा व अत्यावश्यक सेवा व वस्तू यांची वाहतूक, करोना विषाणूंचा संसर्ग टाळण्यासाठी कार्यरत संबंधित आपत्ती निवारण व्यवस्थापनामधील अधिकारी व कर्मचारी तसेच माझ्यावतीने परवानगी दिलेल्या व्यक्तींना लागू नसतील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८, २६९, २७०, २७१ अन्वये फौजदारी शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दि. ३१/०३/२०२० रोजी दिलेला आहे.

सही/- XXX
(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड-अलिबाग**

प्रत :- मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांजकडे माहितीसाठी
प्रत :- मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांजकडे माहितीसाठी
प्रत :- मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी
प्रत :- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर
प्रत :- मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांजकडे माहितीसाठी
प्रत :- पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

२/- सदर आदेश आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा आरोग्य अधिकारी, राजिप, अलिबाग यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड यांजकडे आवश्यक त्या उचित प्रसिध्दीसाठी
प्रत :- उपविभागीय अधिकारी (सर्व) यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी